‘टीसीएस’ला ११,९०९ कोटींचा तिमाही नफा

पीटीआय, नवी दिल्ली

प्रति समभाग १० रुपये लाभांश

टीसीएसच्या संचालक मंडळाची बैठक गुरुवारी झाली. या बैठकीत १ रुपये दर्शनी मूल्याच्या प्रत्येक समभागासाठी १० रुपये लाभांश जाहीर करण्याचा निर्णय घेण्यात आला. कंपनीने जाहीर केलेला हा दुसरा अंतरिम लाभांश आहे.

टाटा समूहातील आघाडीची कंपनी टाटा कन्सल्टन्सी सर्व्हिसेसने (टीसीएस) सप्टेंबरअखेर संपलेल्या तिमाहीतील आर्थिक कामगिरी, पूर्वनियोजनाप्रमाणे गुरुवारी जाहीर केली. कंपनीने गेल्या वर्षीच्या तुलनेत या तिमाहीत ४.९९ टक्के वाढीसह ११,९०९ कोटी रुपयांचा निव्वळ नफा नोंदविला आहे.

टाटा समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांच्या बुधवारी रात्री झालेल्या निधनामुळे तिमाही कामगिरीच्या घोषणेसाठी गुरुवारी संध्याकाळी नियोजित पत्रकार परिषद कंपनीने रद्द केली. मात्र मूळ नियोजनाप्रमाणे संचालक मंडळाची बैठक पार पडली आणि त्यानंतर जुलै-सप्टेंबर तिमाहीतील कामगिरीचे विवरण कंपनीने भांडवली बाजाराला नियमानुसार सादर करण्यात आले.

माहिती-तंत्रज्ञान सेवेतील देशातील सर्वात मोठ्या कंपनीने गेल्या वर्षी सप्टेंबरअखेर संपलेल्या तिमाहीत ११,३४२ कोटी रुपयांना निव्वळ नफा कमावला होता, तर यंदा जूनअखेर संपलेल्या तिमाहीत १२,०४० कोटी रुपयांचा करोत्तर निव्वळ नफा मिळविला होता. टीसीएसचा महसूल ७.०६ टक्क्यांनी वाढून ६४,९८८ कोटी रुपयांवर पोहोचला असून, तो गेल्या वर्षी याच तिमाहीत ६०,६९८ कोटी रुपये होता.

जुलै-सप्टेंबर तिमाहीत टीसीएसचा परिचालन नफा २४.१ टक्क्यांवर आला आहे. गेल्या वर्षीच्या तुलनेत त्यात किंचित ०.२ टक्के घसरण झाली आहे. कंपनीतील एकूण मनुष्यबळ गेल्या तिमाहीत ५,७२६ ने वाढून ६,१२,७२४ वर पोहोचले आहे. चालू आर्थिक वर्षातील पहिल्या सहामाहीत कर्मचाऱ्यांच्या एकूण संख्येत कंपनीने ११ हजारांनी भर घातली आहे.

टाटा न्यासांचे उत्तराधिकारी म्हणून नोएल टाटांचे नाव चर्चेत

वृत्तसंस्था, नवी दिल्ली

टाटा समूहाचे माजी अध्यक्ष रतन टाटा यांच्या निधनाने १६५ अब्ज डॉलरच्या टाटा समूहाच्या देखरेखीत महत्त्वपूर्ण भूमिका बजावणाऱ्या टाटा न्यास (टाटा ट्रस्ट) या संस्थेतही नेतृत्वाची पोकळी निर्माण झाली आहे. टाटा सन्समध्ये टाटा ट्रस्टची बहुसंख्य हिस्सेदारी असून आणि त्याचे मानद अध्यक्षपद रतन टाटा यांच्याकडे होते.

टाटा न्यासांमध्ये विशेषतः सर दोराबजी टाटा ट्रस्ट आणि सर रतन टाटा ट्रस्ट, यांची एकत्रितपणे टाटा सन्समध्ये ६६ टक्के हिस्सेदारी आहे. या न्यासांच्या माध्यमातून शिक्षण, आरोग्य क्षेत्रात सेवाभावी कार्यासह, दानकर्म केले जाते. रतन टाटा यांच्या पश्चात त्यांचे सावत्र भाऊ नोएल टाटा हे नाव या दोन प्रमुख टाटा न्यासांच्या अध्यक्षपदासाठी प्रामुख्याने चर्चेत आहे.

रतन टाटा यांनी त्यांचे उत्तराधिकारी म्हणून कोणाचीही नियुक्ती केली नव्हती आणि उत्तराधिकारी नेमण्याचा निर्णय त्यांनी विश्वस्त मंडळावर सोपवला होता.

त्यानुसार नवीन अध्यक्षाची निवड आता विश्वस्तांवर अवलंबून असून, जे उमेदवाराच्या अंतिमतः निवडीपूर्वी, अंतरिम प्रमुखाची नियुक्ती करण्याची शक्यता आहे.

पारंपरिकरीत्या, टाटा ट्रस्टचे नेतृत्व टाटा कुटुंब आणि पारशी समुदायाशी संलग्न राहिले आहे. टाटा सन्स आणि टाटा न्यास या दोहोंच्या अध्यक्षपदाची दुहेरी भूमिका हाताळलेले रतन टाटा हे शेवटचे होते. मात्र २०२२ पासून, टाटा सन्सचे अध्यक्ष आणि टाटा न्यासांचे अध्यक्ष या भूमिका स्वतंत्र राहतील याची खात्री करून, विश्वस्त मंडळाच्या रचनेत बदल करण्यात आले. हे बदल टाटा न्यासांचा कारभार अधिक मजबूत करण्याच्या समूहाच्या प्रयत्नांचा एक भाग होता.

प्रमुख दावेदार कोण?

रतन टाटा यांच्या निधनानंतर, टाटा न्यासाचे संभाव्य अध्यक्ष म्हणून समूहातील अनेकांची नावे घेतली जात आहेत. विश्वस्त मंडळावरील अनेकांचा संभाव्य उत्तराधिकारी म्हणून विचार केला जात आहे. टीव्हीएस समूहातील ज्येष्ठ उद्योगपती वेणू श्रीनिवासन आणि माजी संरक्षण सचिव विजय सिंग यांचीही नावे चर्चेत आहेत. दोघेही न्यासाचे उपाध्यक्ष म्हणून सध्या काम करतात आणि वर्ष २०१८ पासून त्यांनी न्यासाच्या कारभारात महत्त्वाची भूमिका बजावली आहे. तथापि, प्रमुख दावेदारांमध्ये रतन टाटा यांचे सावत्र भाऊ आणि ट्रेंट लिमिटेड या टाटा समूहातील कंपनीचे विद्यमान अध्यक्ष नोएल टाटा हे नाव आहे. टाटा कुटुंबातील सदस्य असणे आणि चार दशकांहून अधिक कालावधीचा टाटा समूहातील त्यांचा व्यापक अनुभव त्यांच्याकडे आहे. नोएल टाटा २०१९ मध्ये सर रतन टाटा ट्रस्टचे विश्वस्त बनले आणि नंतर ते २०२२ मध्ये सर दोराबजी टाटा ट्रस्टच्या विश्वस्त मंडळात सामील झाले. जर त्यांची निवड झाली तर नोएल हे सर दोराबजी टाटा ट्रस्टचे अकरावे आणि सर रतन टाटा ट्रस्टचे सहावे अध्यक्ष असतील.

बँकिंग समभागांतील तेजीने सेन्सेक्सला बळ

मुंबई : जागतिक बाजारातील मजबूत कल आणि बँकिंग, ऊर्जा क्षेत्रातील समभागांमध्ये गुंतवणूकदारांनी खरेदीचा सपाटा लावल्याने प्रमुख निर्देशांक सेन्सेक्स आणि निफ्टी सकारात्मक पातळीवर स्थिरावले. कोणत्याही मोठ्या घटनेच्या अभावी आणि परकीय निधीचा मोठा ओघ नसूनदेखील प्रमुख निर्देशांक सेन्सेक्सने १४० अंशांची कमाई केली.

दिवसअखेर सेन्सेक्स १४४.३१ अंशांनी वधारून ८१,६११.४१ वर स्थिरावला. दिवसभरात, त्याने ३५३.७४ अंशांची कमाई करत ८२,००२.८४ ही पातळी गाठली होती. दुसरीकडे निफ्टीमध्ये १६.५० अंशांची किरकोळ वाढ झाली. तो २४,९९८.४५ पातळीवर बंद झाला.

टीसीएसच्या माध्यमातून दुसऱ्या तिमाहीत कामगिरीच्या हंगामाची सुरुवात झाली आहे. जागतिक पातळीवर आशियाई बाजारांनी चांगली सुरुवात केली. मात्र अमेरिकेत महागाई वाढीच्या चिंतेने युरोपियन बाजारांमध्ये घसरण झाल्याने सकाळच्या सत्रातील फायदा टिकवून ठेवता आला नाही, असे निरीक्षण जिओजित फायनान्शियल सर्व्हिसेसचे संशोधन प्रमुख विनोद नायर यांनी व्यक्त केले.

कॉसमॉस बँकेच्या मांजरी, ताथवडे शाखेचे उद्घाटन

पुणे : कॉसमॉस को-ऑपरेटिव्ह बँकेच्या मांजरी व ताथवडे या दोन शाखांचे उद्घाटन बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे यांच्या हस्ते झाले. या दोन शाखांमुळे पुण्यात बँकेच्या एकूण ४५ शाखा झाल्या आहेत. शाखांच्या उद्घाटनप्रसंगी उपाध्यक्ष सीए यशवंत कासार, संचालक मंडळातील इतर सदस्य आणि व्यवस्थापकीय संचालिका अपेक्षिता ठिपसे आदी उपस्थित होते. यावेळी बोलताना बँकेचे अध्यक्ष सीए मिलिंद काळे म्हणाले की, पुणे परिसरातील मांजरी व ताथवडे हा भाग वेगाने विकसित होत असून, कॉसमॉस बँकेच्या सर्व अत्याधुनिक सेवा या भागातील ग्राहकांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

इक्विटी म्युच्युअल फंडातील ओघ घटला

सप्टेंबरमध्ये ३४,४१९ कोटींची भर; थीमॅटिक, लार्ज कॅप फंडांकडे ओढा

लोकसत्ता व्यापार प्रतिनिधी

मुंबई: समभागसंलग्न अर्थात इक्विटी म्युच्युअल फंडांनी सरलेल्या सप्टेंबर महिन्यात ३४,४१९ कोटी रुपयांची गुंतवणूक आकर्षित केली. आधीच्या (ऑगस्ट) महिन्याच्या तुलनेत हा ओघ १० टक्क्यांनी घटला आहे. याच वेळी थीमॅटिक आणि लार्ज-कॅप फंडांकडे गुंतवणूकदारांचा ओढा वाढल्याचे असोसिएशन ऑफ म्युच्युअल फंड इन इंडिया अर्थात ‘ॲम्फी’ने गुरुवारी जाहीर केलेल्या आकडेवारीतून समोर आले.

‘ॲम्फी’च्या आकडेवारीनुसार, समभागसंलग्न अर्थात इक्विटी म्युच्युअल फंडातील गेल्या महिन्यांतील गुंतवणुकीचा हा एप्रिल २०२४ नंतरचा नीचांक आहे. त्या महिन्यांत १८,९१७ कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती, असे असले तरी इक्विटी फंडातील निव्वळ गुंतवणुकीचा ओघ सलग ४३ व्या महिन्यांत सकारात्मक राहिला आहे. नियोजनबद्ध पद्धतीने गुंतवणुकीचा पर्याय असलेल्या ‘एसआयपी’च्या माध्यमातून गुंतवणुकीत निरंतर वाढीचा क्रम सप्टेंबरमध्ये सुरू राहिला असून, आधीच्या महिन्यातील २३,५४७ कोटी रुपयांच्या तुलनेत ती २४,५०९ कोटी रुपये अशी वाढली आहे.

म्युच्युअल फंड उद्योगातून सप्टेंबरमध्ये ७१,११४ कोटी रुपयांची गुंतवणूक काढून घेण्यात आली. आधीच्या (ऑगस्ट) महिन्यात या उद्योगात १ लाख ८ हजार कोटी रुपयांची गुंतवणूक झाली होती. यंदा रोखेसंलग्न (डेट फंड) फंडातून १.१४ लाख कोटी रुपये काढून घेण्यात आल्याने एकूण निर्गुंतवणुकीची रक्कम जास्त दिसत आहे. असे असूनही म्यच्युअल फंड उद्योगाच्या व्यवस्थापनाखालील एकूण मालमत्ता गेल्या महिन्यात ६७ लाख कोटी रुपयांवर पोहोचली आहे. आधीच्या महिन्यात ती ६६.७ लाख कोटी रुपये होती, असे ‘ॲम्फी’ने नमूद केले.

IDBI BANK

ताबा सूचना

प्रादेशिक कार्यालय, छ. संभाजीनगर
न्यू उस्मानपुरा, छ. संभाजीनगर, रेणुका कॉम्प्लेक्स, घर. नं. ५-६-१५,
सीटीएस क्रमांक १७३२५, संत एकनाथ रंगमंदिर समोर, न्यू उस्मानपुरा, छ. संभाजीनगर - ४३१००५

आयडीबीआय बँक लि.चे अधिकृत अधिकारी म्हणुन अधोस्वाक्षरी केलेले. सिक्युरिटायझेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शिअल ॲसेट अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ (५४ ऑफ २००२) अंतर्गत आणि कलम १३ (१२) अंतर्गत दिलेल्या अधिकारांचा वापर करताना सुरक्षा व्याज (अंमलबजावणी) नियम २००२ च्या ३ ने मागणी नोटीस जारी केली आहे ज्यात खालील कर्जदारांना नोटीसमध्ये नमुद केलेली रक्कम ही नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत परत करण्याचे आवाहन केले आहे. खाली नमुद केलेले कर्जदार सदर रक्कमेची परतफेड करण्यात अयशस्वी ठरले आहेत, या द्वारे कर्जदारांना आणि सामान्यत: जनतेला नोटीस बजावण्यात येते की खाली स्वाक्षरीदाराने त्यांना उप-कलम (४) प्रदान केलेल्या अधिकारांचा वापर करून खाली वर्णन केलेल्या मालमत्तेचा ताबा घेतला आहे. कायद्याचे कलम१३ हे सिक्युरिटी इंटररेस्ट (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचले आहे. कर्जदाराला विशेषत: आणि सर्वसाधारणपणे सार्वजनिकपणे मालमत्तेचा व्यवहार न करण्याची ताकीद देण्यात आली आहे आणि मालमत्तेशी कोणताही व्यवहार केल्यास शुल्क आकारले जाईल खाली नमुद केलेल्या रक्कमेसाठी आणि त्यावरील व्याजासाठी IDBI बँक लिमिटेड. सुरक्षित मालमत्तेची पूर्तता करण्यासाठी कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (८) च्या तरतूदीकडे, उपलब्ध वेळेच्या संदर्भात आमंत्रित केले आहे.

ताबा नोटीस तपशील

अनु. क्र.	कर्जदाराचे नाव(S) सह-कर्जदार व जामीनदार यांचे नाव	मागणी सूचना तारीख/रक्कम/कायदेशीर खर्च = एकूण रक्कमेचा दावा	मालमत्तेचे वर्णन	ताब्याची तारीख
१	**श्री. दादाराव नारायणराव ईर आणि श्रीमती. संगिता दादाराव ईर**	२६.०७.२०२४ / रु. ३,५८,४५८.००/- त्यावर पुढील व्याजासह	स्थावर मालमत्तेचा तो सर्व भाग आणि पार्सल ज्यामध्ये बेरींग नं. बी-२ (स्टिल्ट फ्लोअर), साई सृष्टी पार्क, सर्वे क्रमांक गट क्रमांक ४४/पी, वाळूज महानगर, गोलवाडी सिडको, औरंगाबाद -४३१००१, महाराष्ट्र राज्यातील **चतुःसिमा** - उत्तरेकडून : मोकळी जागा; दक्षिणेकडून: एफ क्रमांक बी-३; पूर्वेकडून: मोकळी जागा ; पश्चिमेकडून : एफ क्रमांक बी-१;	०७/१०/२०२४

तारीख : ११/१०/२०२४
ठिकाण : छ. संभाजीनगर
टिप : स्वैर भाषांतर, तफावत आढळल्यास मुळ इंग्रजी ग्राह्य धरावे
एसडी/-
अधिकृत अधिकारी, IDBI बँक लि.

HDB FINANCIAL SERVICES

एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

नोंदणीकृत कार्यालय : राधिका, दुसरा मजला, लॉ गार्डन रोड, नवरंगपुरा, अहमदाबाद-३८० ००९.
प्रादेशिक कार्यालय : पहिला मजला, विल्सन हाऊस, जुना नागरदास मार्ग, अंधेरी (पू), मुंबई-४०० ०६९.
शाखा कार्यालय : एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड, पहिला व दुसरा मजला, छाबडा सेन्ट्रल, विद्या नगर, सेव्हन हिल, जालना रोड, औरंगाबाद-४३१ ००१.

स्थावर मालमत्तेच्या विक्रीसंबंधित ई-लिलावाकरिता जाहीर सूचना

इरठे व कागदपत्रांच्या सादरीकरणाकरिता शेवटची तारीख २५.१०.२०२४ रोजी सायं ०५.०० वा.पर्यंत

सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, २००२ (२००२चा नं. ५४) अंतर्गत **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**कडे गहाण असलेल्या स्थावर मालमत्तेची विक्री.

ज्याअर्थी, **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**च्या प्राधिकृत अधिकारीद्वारा एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेडच्या देणींच्या वसुलीकरिता **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे'' आणि ''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर सदर स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता हक्कासह आमच्या शाखेकडील खालील कर्ज खात्यांतील सिक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट, २००२च्या सेक्शन १३(२) अंतर्गत निर्गमित केलेल्या सूचनेनुसार खालील मालमत्तेचा ताबा घेण्यात आला होता. विक्री **https://www.bankeauctions.com** या वेबसाइटवर तरतूद केलेल्या ई-लिलाव प्लॅटफॉर्ममार्फत निम्नस्वाक्षरीकाराद्वारा करण्यात येणार आहे.

स्थावर मालमत्तेचे वर्णन

लॉट नं.	शाखेचे नाव, लोन अकाऊन्ट नंबर व ग्राहकाचे नाव	गहाणवट मालमत्तेचे वर्णन, जी लिलाव विक्रीअंतर्गत आहे व ताब्याचा दर्जा	मागणी सूचना तारीख / थकीत रक्कम (सुरक्षित ऋण)	प्राधिकृत अधिकारीचा तपशील	इरठेचे सादरीकरण अकाऊन्ट तपशील	राखीव किंमत / इरठे रक्कम / बोलीवृद्धी रक्कम	ई-लिलावाची तारीख/ वेळ व इरठे सादरीकरणाची शेवटची तारीख
१.	**एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड,** पहिला व दुसरा मजला, छाबडा सेन्ट्रल, विद्या नगर, सेव्हन हिल, जालना रोड, औरंगाबाद-४३१ ००१. **लोन अकाऊन्ट नंबर : ५९४१५२३** **१. गणेश कृपा एन्टरप्रायझेस २. भाऊसाहेब रामराव जाधवपाटील ३. आशा भाऊसाहेब जाधवपाटील सर्वांचा असलेला पत्ता :** प्लॉट नं. ५९-ए, सर्व्हे नं. ३२/२, भारत नगर, ब्रिजवाडी चिखलठाणा, औरंगाबाद-४३१ ००१, महाराष्ट्र.	''पुढील मालमत्तेचे सर्व खंड व तुकडे- प्लॉट नं. ५९ए व त्यावरील बांधकाम केलेले, गट नं ३२/२, मोजमापाची ९०० चौ.फू. येथे स्थित- भारत नगर, ब्रिजवाडी, औरंगाबाद-४३१ ००१.'' **पुढीलप्रमाणे सीमित : पूर्व :** मंदिर, **पश्चिम :** ६.०९ मी. रुंद रोड, **उत्तर :** प्लॉट नं. ५९ वरील राजेंद्र सिंह यांचे हाऊस, **दक्षिण :** प्लॉट नं. ५८ वरील नूर हसन यांचे हाऊस. **ताब्याचा दर्जा-** प्रत्यक्ष ताबा	०६.०४.२०२२ / **रु. ३५,९६,३७९/-** (रुपये पस्तीस लाख शहाण्णव हजार तीनशे एकोणऐंशी फक्त) उक्त सूचनेच्या तारखेपासून त्यावरील आनुषंगिक खर्च, किंमत व आकार इ.सह एकत्रित प्रत्यक्ष वसुलीपर्यंत संविदात्मक दरातील पुढील व्याज.	**श्री. विजयकुमार सपकाल; मोबा. नं. : ८८८८८७३७८१, ई-मेल आयडी : vijaykumar.sapkal@hdbfs.com**	**अका. नं. ००२१०३१०००२७३१ अका. नाव- एचडीबीएफएस जनरल रिसिप्ट्स, आयएफएससी कोड- एचडीएफसी००००२१ बँक- एचडीएफसी बँक लि. शाखा- हैदराबाद- लकडीकापूल एमआयसीआर कोड- ५००२४०००२**	**रु. १३,५३,३७५/-** (रुपये तेरा लाख त्रेपन्न हजार तीनशे पंचाहत्तर फक्त) / **इरठे रु. १,३५,३३७/-** (रुपये एक लाख पस्तीस हजार तीनशे सदतीस फक्त) / *१५,०००.००	**२६.१०.२०२४ स. ११.०० ते सायं. ०५.००** सहभागीद्वारा बोली प्रक्रियेत दिलेल्या उच्चतर खुल्या बोलीनंतर ५ मिनिटांच्या अमर्यादित विस्तारासह / इरठे सादरीकरणाची शेवटची तारीख **२५.१०.२०२४ रोजी स. ११.०० ते सायं. ०५.००**

शर्ती व अटी : ई-लिलावाचे आयोजन **''जसे आहे जेथे आहे'', ''जसे आहे जे काही आहे''** आणि **''जे काही आहे तेथे आहे''** या तत्त्वावर करण्यात येत आहे.

१. प्राधिकृत अधिकारींच्या उत्तम ज्ञान व माहितीच्या आधारे कोणत्याही मालमत्तेवर तेथे भार नाही. तथापि, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी भार, लिलावावर ठेवलेल्या मालमत्तेचा नामाधिकार आणि दावे/ हक्क/ देणी/ मालमत्तेस प्रभावी ठरणारे अन्य दावे या संबंधित स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**चे कोणतेही प्रतिनिधित्व किंवा कोणतीही बांधिलकी सिद्ध होत नाही आणि सिद्ध होत असलेले मानीव ठरणार नाही. मालमत्तेची विक्री **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड**ला ज्ञात असलेल्या किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान व भावी भारांसह करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे/ हक्क/ देणी याकरिता कोणत्याही स्थितीत जबाबदार असणार नाहीत.

२. बोली सादर करण्यापूर्वी मत्ता व विनिर्देशाबाबत स्वतः पाहाणी करून घेणे व स्वतःचे समाधान करून घेणे याची जबाबदारी बोलीदाराची असेल. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना लिलावाकरिता ठेवण्यात आलेल्या मालमत्तेची पाहणीकरिता **१८.१०.२०२४ ते १९.१०.२०२४** (कार्यालयीन वेळेत) अनुमती देण्यात येईल. स्वारस्य असलेले बोलीदार लॉग-इन आयडी व पासवर्डद्वारा **https://www.bankeauctions.com** या वेबपोर्टलमार्फत त्यांची इरठे सादर करू शकतील (युजर आयडी व पासवर्ड **https://www.bankeauctions.com** यावर नावाची नोंदणी करून विनामूल्य प्राप्त करता येईल). इरठे वर नमूद केलेल्या खात्यामध्ये डिमाण्ड ड्राफ्टद्वारा देय असणार आहे. वेब पोर्टलमध्ये बोलीदाराद्वारा नोंदणी केल्यानंतर (एकदा) स्वारस्य असलेल्या बोलीदार/ खरेदीदाराने बोली कागदपत्रांच्या प्रती म्हणजेच i) एनईएफटी/ आरटीजीएस चलन किंवा डिमाण्ड ड्राफ्टची प्रत, ii) पॅन कार्डची प्रत, iii) ओळखपत्र पुरावा/ पत्त्याचा पुरावा (केवायसी) म्हणजेच स्वयं-साक्षांकित वोटर आयडी कार्डची प्रत/ ड्रायव्हिंग लायसन्स/ पासपोर्ट इ. सादरीकरणाची शेवटची तारीख व वेळेपूर्वी वेब पोर्टलमध्ये अपलोड केलेल्या कागदपत्रांच्या प्रती प्राप्त करणे आवश्यक आहे; त्याशिवाय बोली नामंजूर होण्यास पात्र ठरतील. यथोचितरीत्या भरल्यानंतर परिशिष्ट-II व IIIची स्कॅन्ड प्रत अपलोडिंग करणे (https://www.bankeauctions.com या वेब पोर्टलवरून डाऊनलोड करता येईल) व ती स्वाक्षरीकृत असणेसुद्धा आवश्यक आहे. स्वारस्य असलेले बोलीदार, ज्यांना लॉग-इन आयडी व पासवर्डची निर्मिती, अपलोडिंग डेटा, बोली कागदपत्रांचे सादरीकरण, ऑनलाइन परस्पर बोली इ. वरील प्रशिक्षण/ प्रात्यक्षिक याकरिता साहाय्य हवे असल्यास, ते संपर्क साधू शकतील : तिसरा मजला, प्लॉट नं. ६८, सेक्टर-४४, गुरुग्राम, हरयाणा-१२२ ००३, ई-मेल आयडी : support@bankeauctions.com, सपोर्ट हेल्पलाइन नंबर्स : +९१ १२४ ४३०२०२०/ २०२१/ २०२२/ २०२३/ २०२४, सपोर्ट **मोबा. नं. : +९१७२९१९८११२४/ २५/२६. विक्री चौकशी : sales@bankeauctions.com, मोबा. : +९१७२९१९८११२९,** पोर्टल : **https://www.bankeauctions.com** वेब : **www.c1india.com** आणि कोणत्याही मालमत्तेसंबंधित शंकांकरिता संपर्क साधता येईल : **एरिया मॅनेजर : श्री. चेतन धनगर, मोबा. नं. : ७८२०८२९४२३,** ई-मेल आयडी : **chetan.dhangar@hdbfs.com** व **प्राधिकृत अधिकारी : श्री. विजयकुमार सपकाल; मोबा. नं. : ८८८८८७३७८१, ई-मेल आयडी : vijaykumar.sapkal@hdbfs.com** सोमवार ते शनिवार कार्यालयीन वेळेत.

३. स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी **२५.१०.२०२४ रोजी सायं. ०५.०० पर्यंत किंवा तत्पूर्वी** त्यांची बोली कागदपत्रे [इरठे (राखीव किमतीच्या खाली नसलेली) आणि आवश्यक कागदपत्रे (पॉइन्ट नं. ४ मध्ये नमूद केलेली)] सादर करावयाची आहेत आणि नोंदणी प्रक्रियेच्या अनुसरणानंतर (एक वेळा) व त्यांचा स्वतःचा युजर आयडी व पासवर्डची निर्मिती केल्यानंतर प्राधिकृत अधिकारींची मान्यता आणि/ किंवा नियत (कागदपत्रांची) पडताळणीच्या विषयाधीन लिलाव प्रक्रियेत सहभागी होण्याकरिता स्वारस्य असलेले बोलीदार पात्र ठरतील.

४. ऑनलाइन परस्पर बोलीदरम्यान कालावधीत, बोलीदार ‘बोलीवृद्धी रक्कम’ (वर नमूद केलेली) किंवा त्या पटीत आणि ई-लिलाव बंद होण्याच्या शेवटच्या ५ मिनिटांत, बंद होण्याच्या वेळेत आपोआप ५ मिनिटांकरिता वाढ देण्यात येईल (प्रत्येक वेळी ई-लिलाव प्रक्रिया बंद होईपर्यंत), अन्यथा ती आपोआप बंद होईल, त्यांच्या बोलीत वाढ करू शकतील. जे बोलीदार ई-लिलाव प्रक्रिया बंद होतेवेळी उच्चतर बोली सादर करतील (राखीव किमतीच्या खाली नसलेली) त्यांना, आवश्यक पडताळणीनंतर, प्राधिकृत अधिकारी/ सुरक्षित धनकोद्वारा यशस्वी बोलीदार म्हणून घोषित करण्यात येईल.

५. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम ठेव (इरठे) विक्रीच्या विचाराधीन ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदाराची इरठे परत करण्यात येईल. इसारा रक्कम ठेवीवर कोणतेही व्याज मिळणार नाही. यशस्वी बोलीदाराने प्राधिकृत अधिकारीद्वारा बोली किमतीच्या स्वीकृतीच्या २४ तासांच्या आत विक्री किमतीच्या, आधीच प्रदान केलेल्या इरठेचे समायोजन करून, २५% जमा करावयाची आहे आणि उर्वरित विक्री किमतीची ७५% रक्कम विक्रीच्या १५व्या दिवशी किंवा तत्पूर्वी किंवा प्राधिकृत अधिकारीच्या एकमेव स्वेच्छाधिकारावर व लिखित मान्यता दिल्यानुसार सदर विस्तारित कालावधीत भरावयाची आहे. जर यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदान करण्यास कोणतीही कसूर झाल्यास, प्रस्तावाद्वारा आधीच भरलेली रक्कम जप्त होण्यास पात्र ठरेल आणि मालमत्ता पुन्हा विक्रीकरिता ठेवण्यात येईल आणि कसूर करणाऱ्या बोलीदाराचा मालमत्ता/ रकमेबाबत कोणताही दावा/ हक्क असणार नाही.

६. भावी अर्हताप्राप्त बोलीदार ई-लिलावाच्या तारखेपूर्वी **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.**कडून ऑनलाइन प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील. प्राधिकृत अधिकारी/ **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड** किंवा **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि.** कोणत्याही इंटरनेट नेटवर्क समस्येकरिता पात्र असणार नाहीत आणि स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी ई-लिलावात सहभागी होण्याकरिता तांत्रिकदृष्ट्या सुसज्ज असल्याची खात्री करून घ्यावी.

७. खरेदीदार लागू स्टॅम्प ड्यूटीज/ अतिरिक्त स्टॅम्प ड्यूटी/ हस्तांतरण आकार, शुल्क इ. आणि सर्व सांविधिक/ बिगर-सांविधिक देणी, कर, दर, निर्धारित आकार, कोणाकडीलही शुल्क इ. सोसतील.

८. प्राधिकृत अधिकारी उच्चतर प्रस्ताव स्वीकारण्यास बांधील नाहीत आणि प्राधिकृत अधिकारीस त्याकरिता कोणतेही कारण न देता ई-लिलाव स्थगित करण्याचा/ पुढे ढकलण्याचा/ रद्द करण्याचा किंवा कोणताही किंवा सर्व प्रस्ताव स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा एकमेव हक्क आहे.

९. बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी ई-लिलावात सहभागी होण्यापूर्वी आणि त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी **मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि., https://www.bankeauctions.com** च्या वेब पोर्टलवर उपलब्ध असलेल्या ई-लिलावाच्या सविस्तर शर्ती व अटी पाहाव्यात.

विशेष सूचना :

१०. बोलीदारांनी स्व-हितासाठी शेवटच्या क्षणी बोली सादर करणे टाळावे, ज्याकरिता कोणतीही त्रुटी/ अपयश (इंटरनेट फेल्यूअर/ पॉवर फेल्यूअर इ.) **एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड** किंवा सेवा-पुरवठाकार जबाबदार असणार नाहीत, अशा प्रकारच्या अनिश्चित परिस्थितीस सामोरे जाण्याकरिता बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पॉवर सप्लाय बॅक-अप इ.सारख्या सर्व आवश्यक व्यवस्था/ पर्याय ठेवणे आवश्यक आहे, जेणेकरून अशा परिस्थितीवर मात करता येईल आणि लिलावातील यशस्वीरीत्या सहभागास त्यांना सक्षम होता येईल.

सरफेसी ॲक्ट, २००२ अंतर्गत ३० दिवसीय सांविधिक विक्री सूचना

ऋणको/ हमीदारांना याद्वारा अधिसूचित करण्यात येते की, त्यांनी ई-लिलावाच्या तारखेपूर्वी आत्ताच्या तारखेपर्यंतचे व्याज व साहाय्यभूत खर्चासह वर नमूद केलेल्या रकमेचे प्रदान करावे, त्यास असमर्थ ठरल्यास मालमत्तेचा लिलाव करण्यात येईल/ विक्री करण्यात येईल आणि उर्वरित देणी, असल्यास, व्याज व किमतीसह वसूल करण्यात येईल.

स्थळ : औरंगाबाद
दिनांक : १०.१०.२०२४
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
एचडीबी फायनान्शियल सर्व्हिसेस लिमिटेड

उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

नोंदणीकृत कार्यालय : ग्रेप गार्डन, नं. २७, तिसरा ए क्रॉस, १८वा मेन, ६वा ब्लॉक, कोरामंगला, बेंगालुरू-५६० ०९५, कर्नाटक.
प्रादेशिक कार्यालय: ७वा मजला, अल्मोंटे आयटी पार्क, सर्व्हे नं. ८, खराडी-मुंडवा बायपास, व्हिलेज खराडी, पुणे-४११०१४.

जाहीर लिलाव सूचना

सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रुल्स, २००२ च्या रुल ८(६) व ९ च्या तरतुदींसह वाचलेल्या सिक्युरिटायजेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेट्स ॲण्ड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट (सरफेसी ॲक्ट) २००२ अंतर्गत विक्रीकरिता जाहीर सूचना.

"उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि."च्या प्राधिकृत अधिकारी असलेल्या निम्नस्वाक्षरीकारांनी सरफेसी ॲक्टच्या सेक्शन १३(४) अंतर्गत प्रदान केलेल्या अधिकारांच्या अंमलबजावणीत खालील मालमत्तेचा ताबा घेतला आहे. विशेषकरून ऋणको व आम जनतेस कळविण्यात आले आहे की, बँकेच्या देणींच्या वसुलीकरिता याखाली नमूद केलेल्या खात्यातील गहाणवट मालमत्तेचा जाहीर लिलाव खालीलप्रमाणे विहित केल्यानुसार "जसे आहे जेथे आहे" व "जसे आहे जे काही आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

अ. क्र.	लोन अका. नं./ शाखा	ऋणको / सह-ऋणको / हमीदार / गहाणकाराचे नाव	१३(२) सूचना तारीख / थकीत देणी (रु.'त) रोजीप्रमाणे	ताब्याची तारीख	राखीव किंमत आयएनआरमध्ये/ इरठे आयएनआरमध्ये
1	4455210130000121/ 4455- Samarth Nagar	**१) अनिल अशोकराव बोडके २) स्वाती अनिल बोडके,** दोघांचा निवासी पत्ता : हाऊस नं. ३७, नर्सरी कॉलनी, रांजणगाव, औरंगाबाद-४३११३६, महाराष्ट्र.	22.11.2021/ Rs. 837143.00 as on 01.11.2021	26.07.2024	Rs. 9,71,000/- / Rs. 97,100/-
	स्थावर मालमत्तेचे वर्णन : हाऊस नं. ३, मिळकत नं. ११४०७/ए, मोजमापाचे ३२६.७० चौ.फू. बिल्ट-अप ३२६.७० चौ.फू., मौजे रांजणगाव, शेनपुंजी, ता. गंगापूर, जि. औरंगाबाद.				

मालमत्तेच्या पाहाणीची तारीख व वेळ :: १८.१०.२०२४ व १६.११.२०२४ रोजी स. ११:०० वा व दु. ०४:०० वा दरम्यान
बोली व इरठेच्या सादरीकरणाची तारीख :: २०.११.२०२४ रोजी स. ११:०० वा पासून ते सायं ०५:०० पर्यंत
लिलावाची तारीख व वेळ :: २१.११.२०२४ रोजी स. ११:०० पासून ते दु. ०२:०० पर्यंत

आयएनआरमधील इसारा रक्कम ठेव (इरठे) ("उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि."च्या नावे डिमांड ड्राफ्टद्वारा प्रदान केली पाहिजे)
बोलीचे सादरीकरण व लिलावाचे स्थळ : १) "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.", श्री व्हिल्ला, पोलीस वर्कशॉपसमोर, निराला बाजार रोड, समर्थनगर, औरंगाबाद-४३१००१.
(संपर्क तपशील : भक्ती नेणा - ९२२४४७१४९४, शिवाजी खाडे - ७०५८०८०९१५)

शर्ती व अटी :- ई-लिलावाचे आयोजन "जसे आहे जेथे आहे", "जसे आहे जे काही आहे" व "जे काही आहे तेथे आहे" या तत्त्वावर करण्यात येणार आहे.

१. प्राधिकृत अधिकाऱ्यांना असलेल्या उत्तम ज्ञान व माहितीनुसार तेथे कोणत्याही मालमत्तेवर कोणताही भार नाही. तथापी, स्वारस्य असलेल्या बोलीदारांनी त्यांच्या बोली सादर करण्यापूर्वी लिलावावर ठेवलेल्या मालमत्तेचा भार, नामाधिकार आणि मालमत्तेस प्रभावी ठरणारे दावे/हक्क/देणी या संबंधित त्यांनी स्वतः स्वतंत्र चौकशी करावी. ई-लिलाव जाहिरात बँकेचे कोणतेही प्रतिनिधीत्व आहे असे बांधील नाही किंवा मानीव ठरणार नाही. मालमत्तेची विक्री बँकेला ज्ञात असलेले किंवा ज्ञात नसलेल्या सर्व विद्यमान किंवा भावी भारासह करण्यात येत आहे. प्राधिकृत अधिकारी / सुरक्षित धनको कोणत्याही त्रयस्थ पक्षकाराचे दावे / हक्क / देणींकरिता कोणत्याही तऱ्हेने जबाबदार असणार नाहीत.

२. बोली सादर करण्यापूर्वी मत्ता व विनिर्देशाबाबत मालमत्तेची पाहाणी करणे व स्वतःचे समाधान करून घेण्याची जबाबदारी बोलीदाराची असणार आहे. लिलावाकरिता ठेवलेल्या मालमत्तेची पाहाणी प्रत्येक मालमत्तेच्या अनुसार नमूद केल्यानुसार साईट्सकडे करण्यास स्वारस्य असलेल्या बोलीदारांस अनुमती देण्यात येणार आहे.

३. स्वारस्य असलेले बोलीदार वर नमूद केल्यानुसार लिलाव तारखेच्या एक दिवस पूर्वी निम्नस्वाक्षरीकार असलेल्या प्राधिकृत अधिकारींसमोर सादर करतील.

४. ई-लिलावाचे आयोजन "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँके"चे मान्यताप्राप्त ई-लिलाव सेवा-पुरवठाकार - मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि., संपर्क व्यक्ती - प्रभाकरन एम (मोबा. नं. ७४१८२८१७०९) द्वारा करण्यात येणार आहे. स्वारस्य असलेल्या बोलीदारांना सल्ला देण्यात येतो की, त्यांनी वेबसाइटमधील मालमत्तेच्या तपशीलाकरिता https://www.bankeauctions.com किंवा https://www.ujjivansfb.in/e-auctions यावर भेट द्यावी आणि बोली प्रक्रियेमध्ये भाग घेण्याकरिता त्यांनी https://www.bankeauctions.com या पोर्टलवर त्यांच्या नावांची नोंदणी केली पाहिजे आणि विनामूल्य त्यांचा युजर-आयडी व पासवर्ड प्राप्त करावा. भावी बोलीदार सेवा-पुरवठाकार मेसर्स सी१ इंडिया प्रा. लि., हेल्पलाईन नंबर्स - ७२९१९१८८२४, २५, २६, सपोर्ट ईमेल आयडी : support@bankeauctions.com यांच्याकडून ई-लिलावावर ऑनलाइन प्रशिक्षणाचा लाभ घेऊ शकतील.

५. मालमत्तेची विक्री सुरक्षित धनकोद्वारा म्हणजेच "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक लि.", बोलीच्या स्वीकृतीच्या विषयाधीन उच्चतर बोलीदारास/प्रस्तावास करण्यात येणार आहे. तथापि, निम्नस्वाक्षरीकारास जर आवश्यकता भासल्यास परस्पर बोलीस अनुमती देण्याचा एकमेव हक्क आहे. प्राधिकृत अधिकारीस, कोणतेही कारण न दाखवता कोणताही प्रस्ताव/निविदा स्वीकारण्याचा किंवा नामंजूर करण्याचा स्वेच्छाधिकार आहे.

६. यशस्वी बोलीदाराची इसारा रक्कम ठेव (इरठे) विक्रीच्या विचाराधीन भाग म्हणून ठेवून घेण्यात येईल आणि अयशस्वी बोलीदाराची इरठे परत केली जाईल. इसारा रक्कम ठेवीवर कोणतेही व्याज मिळणार नाही. यशस्वी बोलीदाराने विक्री किमतीच्या, आधीच प्रदान केलेल्या इरठेचे समायोजन करून, २५% ठेव प्राधिकृत अधिकारीद्वारा बोली किमतीच्या स्वीकृतीच्या २४ तासांच्या आत भरावयाची आहे आणि उर्वरित ७५% विक्री किंमत विक्रीच्या १५व्या दिवशी किंवा तत्पूर्वी किंवा प्राधिकृत अधिकारींच्या एकमेव स्वेच्छाधिकारावर व तसे लिखित मान्य केल्यानुसार ३ महिन्यांपेक्षा अधिक कालावधीत नसलेल्या कोणत्याही प्रकरणात सदर विस्तारित कालावधीच्या आत भरावयाची आहे. यशस्वी बोलीदाराद्वारा प्रदानात कसूर झाल्यास, प्रस्तावकर्त्याद्वारा आधीच भरलेली ठेव रक्कम जप्त होण्यास पात्र ठरेल आणि मालमत्ता पुनर्लिलावाकरिता ठेवण्यात येईल आणि कसूर करणाऱ्या खरीददाराचा मालमत्ता / रकमेबाबत कोणताही दावा / हक्क असणार नाही.

७. प्रसिद्धी सक्तीच्या घटना कलमाच्या विषयाधीन आहे.

८. शेवटच्या क्षणी बोली लावणे बोलीदाराच्या स्व-हितार्थ टाळावे, जेणेकरून "उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक" किंवा सेवा-पुरवठाकार कोणतीही चूक / अपयश (इंटरनेट फेल्युअर/पॉवर फेल्युअर, इ.) याकरिता जबाबदार असणार नाही. अशा आकस्मिक परिस्थितीवर मात करण्याकरिता बोलीदारांना विनंती करण्यात येते की, त्यांनी पॉवर सप्लाय, बॅक-अप, इ.सारख्या सर्व आवश्यक व्यवस्था/पर्यायांची तरतूद करावी, जेणेकरून ते अशा आकस्मिक परिस्थितीवर मात करू शकतील आणि लिलावात यशस्वीरित्या सहभागी होण्यास त्यांना सक्षम होता येईल.

ही सूचना उपरिनामित ऋणको / हमीदार / गहाणकाराकरिता गहाणवट मालमत्तेच्या विक्रीकरिता निर्धारित जाहीर लिलावाबाबतसुद्धा आहे.

स्थळ : औरंगाबाद
तारीख : १०.१०.२०२४
स्वाक्षरी/- प्राधिकृत अधिकारी
उज्जीवन स्मॉल फायनान्स बँक

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८
फ क्षेत्रीय कार्यालय, निगडी - ४११ ०४४
आरोग्य विभाग

निविदा नोटीस क्र. ०१/२०२४-२०२५

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या "फ" क्षेत्रीय कार्यालय कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र- १, ११, १२ व १३ मधील सार्वजनिक शौचालय व मुता-यांची यांत्रिकी पद्धतीने (पाण्याचे उच्चदाब फवा-याच्या सहाय्याने) व मनुष्यबळाद्वारे दैनंदिन साफसफाई, देखभाल करणे या कामासाठी ई-टेंडरींग पध्दतीने ठेकेदाराची नियुक्ती करणेसाठी निविदा दर मागविणेत येत आहे.

अ. क्र	कामाचे स्वरुप	निविदा अंदाजपत्रकीय र.रू	बयाणा र.रू (१%)	अनामत र.रू (५%)	फॉर्म फी +१२% GST	कामाची मुदत
१	**"फ" क्षेत्रीय कार्यालय** कार्यक्षेत्रातील प्रभाग क्र. १, ११, १२ व १३ मधील **शौचालय/मुतारी**-५४७ सिट्सची मनुष्यबळ व यांत्रिकी पध्दतीने तसेच आवश्यक रसायने वापरून दिवसातून ४ वेळा साफसफाई करणे	४,०२,०४,३७४/-	४,०२,०४४/-	२०,१०,२१९/-	२४,२५०	०३ वर्ष

निविदेचे वेळापत्रक

ई-निविदा उपलब्ध कालावधी	:-	दिनांक ११/१०/२०२४ ते दिनांक २१/११/२०२४
निविदा भरणेची अंतिम दिनांक व वेळ	:-	दिनांक २१/११/२०२४ दुपारी ३.०० वा
निविदा पुर्व बैठक दिनांक व वेळ	:-	दिनांक २३/१०/२०२४ सकाळी ११.०० वा
निविदा उघडणेचा दिनांक	:-	दिनांक २५/११/२०२४

कोणतेही कारण न देता निविदा पूर्णतः किंवा अशंतः मंजुर अथवा नामंजुर करण्याचा अधिकार मा. आयुक्तसो. /मा.अति.आयुक्त(२) सो./मा. क्षेत्रीय अधिकारी सो.यांनी स्वतःकडे राखुन ठेवला आहे. सदरची निविदा http://mahatenders.gov.in व www.pcmcindia.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे.निविदा संचाची विक्री ई निविदा सुचनेत नमुद केलेल्या दिनांकापासुन सुरु राहिल.

सदरची ई-निविदा प्रणाली वापराबाबत काही तांत्रिक अडचणी निर्माण झाल्यास NIC यांच्याकडील ई-मेल supporteproc.nic.in Help Desk Number 0120-4200462, 0120-4001002, 0120-4001005, 0120-6277787 या दुरध्वनीवर संपर्क साधावा.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी-४११०१८

जाहिरात क्र. 262
जा.क्र. फक्षेका/आ/२/कावि/५५२/२०२४
दि.०४/१०/२०२४